निबंधक, भागीदारी संस्था, मुंबई या कार्यालयामध्ये जुन्या पद्धतीने नोंदणी झालेल्या भागीदारी संस्थांच्या घटनेतील बदलाबाबतचे तसेच निरीक्षण व प्रमाणित प्रती या सर्व बाबींचे शुल्क सध्याच्या प्रणालीमध्ये ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यास मंजूरी देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

विधि व न्याय विभाग

शासन निर्णय क्रमांक : निभासं - १११८/५६७/(प्र.क्र.१८४/१८)/कार्या-१७.

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- २० ऑक्टोबर, २०१८

वाचा - (१) शासन निर्णय, विधि व न्याय विभाग क्र.निभासं २०१६/अनौ.२७ (११६)/का.१७, दि. २३ ऑगस्ट, २०१६

(२) प्रभारी निबंधक, भागीदारी संस्था, मुंबई यांचे पत्र क्र.आरस्था ३८११/संगणकीकरण/(१४८/११)/दोन/३१६, दि. ०१.१०.२०१८

निबंधक, भागीदारी संस्था
महाराष्ट्र राज्य, मुंबई
आवक क्र. ७५०९
दिनांक : 25 OCT 2018

**प्रस्तावना :**

निबंधक, भागीदारी संस्था, मुंबई या कार्यालयामध्ये दि. २१.०२.२०१३ पासून भागीदारी संस्थेची नवीन नोंदणी व ऑनलाईन नोंदणी झालेल्या भागीदारी संस्थेच्या घटनेतील बदलाबाबतचे अर्ज व इतर कागदपत्रं ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यास बंधनकारक करण्यात आले. परंतु प्रलंबित अर्जावर कार्यवाही पूर्ण होण्याकरिता काही दिवस जुन्या पद्धतीने स्विकारलेल्या अर्जावर कार्यवाही करणे सुरु ठेवण्यात आले होते. त्यानंतर दि. ०१.०७.२०१५ पासून जुन्या पद्धतीची नवीन नोंदणी पूर्ण बंद करुन फक्त ऑनलाईन पद्धतीने नवीन नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले. या संदर्भात दि.२३.०८.२०१८ च्या शासन निर्णयानुसार दि. १६.१०.२०१७ पासून नवीन संगणक प्रणाली कार्यान्वित करण्यात येऊन, त्याद्वारे फक्त ऑनलाईन पद्धतीने होणाऱ्या नोंदणीसाठी ऑनलाईन फी स्विकारण्यास सुरुवात करण्यात आली आहे. सद्यस्थितीत उक्त कार्यालयाच्या संगणक प्रणालीमध्ये नोंदणी व विलंब शुल्क ग्रासद्वारे स्विकारण्यासाठी मॉड्यूल तयार करण्यात आले असून, ते ग्रास प्रणालीशी जोडण्यासाठी २ ते ३ महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. ही बाब विचारात घेता जुन्या पद्धतीने नोंदणी झालेल्या भागीदारी संस्थांच्या घटनेतील बदलाबाबतचे तसेच निरीक्षण व प्रमाणित प्रती



Scanned by CamScanner

या सर्व बाबींचे शुल्क सध्याच्या प्रणालीमध्ये ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय-</u>**

निबंधक, भागीदारी संस्था, मुंबई या कार्यालयामध्ये जुन्या पद्धतीने नोंदणी झालेल्या भागीदारी संस्थांच्या घटनेतील बदलाबाबतचे तसेच निरीक्षण व प्रमाणित प्रती या सर्व बाबींचे शुल्क सध्याच्या प्रणालीमध्ये ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे. सदरची मंजूरी ही, नोंदणी व विलंब शुलक ग्रास प्रणालीद्वारे स्विकारण्यासाठी तयार करण्यात आलेले मॉड्यूल कार्यरत होईपर्यंतच्या कालावधीसाठी (म्हणजेच अंदाजे ३ ते ४ महिन्यांसाठी ) लागू राहील. यासंदर्भात विहित अर्जावर भागीदारांनी स्वाक्षरी करुन नियमानुसार साक्षांकित केल्यानंतरच फी भरल्यास असा / असे अर्ज स्विकारले जातील या अटीवर सदर मंजूरी देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

का.रा.पिळणकर
२०-१०-१८

(का.रा.पिळणकर)
कार्यासन अधिकारी

प्रति,

१. प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२. निबंधक, भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. सहायक निबंधक भागीदारी संस्था, पुणे /नागपूर/औरंगाबाद.
४. कार्यासन १७ - संग्रहार्थ.

Scanned by CamScanner